महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
मंत्रालय विस्तार भवन, रु.नं.एम-५,पोटमाळा
हुतात्मा राजगुरु चौक , मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
फोन क्र. ०२२-२२७९४१२९/२२७९३७१४

GOVERMENT OF MAHARASHTRA
Tribal Development Department
Mantralaya Annexe Ro.No.M-५
Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Road,
Mantralaya, Mumbai - ४०० ०३२.
ईमेल : gajanan.deshmukh67@nic.in

नस्ती क्र: घकुयो-२०१८/प्र.क्र. २३१ /का.१७,
दिनांक: २५ जूलै, २०१८.

प्रति,

संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण,
५ वा मजला, सिडको भवन (दक्षिण कक्ष),
सीबीडी, बेलापूर.

**विषय:-** शबरी आदिवासी घरकुल योजना सन २०१७-१८ ते २०१९-२० व पारधी आवास योजना सन २०१७-१८

संदर्भ :- आपले कार्यालयाचे पत्र क्र राज्य योजना/१२९५/२०१८ दि. १९.३.२०१८

महोदय,

संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, राज्यातील अनुसूचीत जमातीच्या व्यक्तींना घरकुल उपलब्ध करुन देण्यासाठी "शबरी आदिवासी घरकुल योजना" दिनांक २८.३.२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येते. वगळण्याच्या निकषानुसार (Exclusion Criteria) प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधून वगळलेली परंतू ज्या कुटुंबाचे मासिक उत्पन्न रु.१०,०००/ पेक्षा कमी आहे. अशा शबरी आदिवासी घरकुल योजनेकरीता पात्र असलेल्या ३३६१३ लाभार्थ्यांचे (SECC-२०११ डाटानुसार )शासन पत्र दिनांक ५.८.२०१७ अन्वये सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० चे अनुक्रमे ११२०५, ११२०५, ११२०३ असे एकूण ३३६१३ घरकुलांचे जिल्हानिहाय उद्दिष्ट आपणास कळविण्यात आले आहे. जिल्हास्तरावर लाभार्थ्यांची निवड करणे सुलभ व्हावे, याकरीता वरील उद्दिष्टानुसार SECC-२०११ डाटावरुन लाभार्थ्यांच्या यादीची जिल्हावार Soft कॉपी शासन पत्र दिनांक ६.१२.२०१७ अन्वये उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर यादी पुर्णत: वापरण्यात आल्यानंतर संबंधीत जिल्हयाकडे लाभार्थी शिल्लक नसल्यास व शबरी आदिवासी घरकुल योजनेच्या वेळोवेळी निश्चित केलेल्या निकषानुसार पात्र लाभार्थीचे प्रस्ताव जिल्हा व तालुकास्तरावर प्राप्त झाले असतील तर त्या लाभार्थ्यांना शबरी आदिवासी घरकुल योजनेचा लाभ देण्यास हरकत नाही.

२. वरील परिच्छेदात नमुद केल्यानुसार शबरी आदिवासी घरकुल योजनेअंतर्गत जिल्हास्तरावर लाभार्थ्यांची निवड करणे सुलभ व्हावे, याकरीता वरील उद्दिष्टानुसार SECC-२०११ डाटावरुन लाभार्थ्यांच्या यादीची जिल्हावार Soft कॉपी शासन पत्र दिनांक ६.१२.२०१७ अन्वये उपलब्ध करुन देण्यात आली आहे. परंतु पारधी विकास कार्यक्रमाअंतर्गत घरकुल योजनेकरीता पारधी जमातीचा लाभार्थ्यांची अशी यादी उपलब्ध नसल्याने शासन स्तरावरुन लाभार्थ्यांची यादी उपलब्ध करुन देता येणार नाही. पारधी पाड्यांची माहिती प्रत्येक जिल्हा प्रशासनाकडे उपलब्ध असते, संबंधीत मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद/ ग्रामपंचायत

यांच्याकडून सदरची माहीती घ्यावा. पारधी विकास कार्यक्रमाची मंजुर केलेली घरकुल शबरी आदिवासी घरकुल योजनेसंदर्भात वेळोवेळी निर्गमित शासन निर्णयानुसार निश्चित केलेल्या निकषानुसार बांधण्या यावीत, असा निर्णय, शासन निर्णय क्र.घरकुल-२०१६/प्र.क्र.३७/का१७ दि.२७ मे, २०१६ घेण्यात आला आहे. त्यामुळे पारधी विकास कार्यक्रमाअंतर्गत घरकुल योजनेवरील लाभार्थी निवड ही शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत वेळोवेळी केलेला निकषानूसार करावी, ही विनंती.

आपला,

(गजानन रा. देशमुख)
कक्ष अधिकारी

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
३) अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, अमरावती, व नागपूर.
४) सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा.
५) सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.